सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक** :२२५३/वसंअ/उ.ता./२०२०/१६ **दिनांक** :- २२ डिसेंबर, २०२२

## - घोषणा -

**विषय :- "वरिष्ठ संशोधन अधिकारी गट-अ (श्रेणी - २),आदिवासी विकास विभाग चाळणी परीक्षा - २०२२" (जाहिरात क्रमांक १५/२०२०)** या ऑनलाईन चाळणी परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक ०१ डिसेंबर, २०२२** रोजी आयोजित **"वरिष्ठ संशोधन अधिकारी गट-अ (श्रेणी-२), आदिवासी विकास विभाग चाळणी परीक्षा - २०२२"** या ऑनलाईन चाळणी परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकेची उत्तरतालिका ही संगणक प्रणालीआधारे निर्धारीत केलेल्या Question ID नुसार योग्य उत्तराचा पर्याय नमूद करुन प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. उमेदवारांनी त्यांच्या Profile मध्ये प्राप्त झालेल्या प्रश्नपुस्तिकेतील Question ID नुसार उत्तरतालिका तपासणे आवश्यक राहील.

२. सदर परीक्षेमधील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| Sr. No. | Master Question No. | Question ID |
|---|---|---|
| **1** | **33** | **750782561** |
| **2** | **34** | **750782562** |
| **3** | **38** | **750782566** |

३. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावरील दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ व १ जुलै, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने व विहित शुल्काचा भरणा करुन हरकती सादर करणे आवश्यक आहे.

४. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/ पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती तसेच विहित शुल्काचा भरणा न केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा **दिनांक २७ डिसेंबर, २०२२** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत सुरु राहील.

६. ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

ठिकाण : मुंबई